# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** पालघर **P.S.(ठाणे):** भोईसर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0053 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**09/02/2023 01:34

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 08/02/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 09/02/2023
**Time From (वेळेपासून):** 13:14 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 01:05 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 09/02/2023 **Time (वेळ):** 01:05 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 002

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/02/2023 01:05 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 6 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** अजय बियर शप, नं2046, बोईसर चिल्हार रोड, ,वारांगडे पालघर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** भोईसर

**District(State) (जिल्हा(राज्य)):** पालघर(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** रविंद्र बापुराव दाभाडे
(b) **Father's Name (वडील चे नाव) :** बापुराव दाभाडे
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1967
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 00,मोहपाडा, लोकमान्यनगर,कचेरी रोड, पालघर,पालघर,भोईसर,पालघर, महाराष्ट्र,401501,भारत |
| 2 | स्थायी पता | 00,मोहपाडा, लोकमान्यनगर,कचेरी रोड, पालघर,पालघर,भोईसर,पालघर, महाराष्ट्र,401501,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-7558786671

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अजय सुरेश शिनवार | | | 1. 00,वारांगडे, आठलेपाडा-वारांगडे,पोबेटेगाव, बोईसर पूर्व, पालघर,भोईसर,पालघर,महाराष्ट्र, भारत-401501 |
| 2 | विक्रांत राजेंद्र चुरी | | | 1. 00,वारांगडे-आठलेपाडा, वारांगडे,पो बेटेगाव, बोईसर पूर्व, पालघर,भोईसर,पालघर,महाराष्ट्र, भारत-401501 |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादि दिनांक 08/02/2023

मी श्री.रविंद्र बापुराव दाभाडे, वय 56 वर्षे, धंदा-मजूरी/पत्रकार, रा.मोहपाडा, लोकमान्यनगर, कचेरी रोड, पालघर ता.जि.पालघर, मोबाईल क्र.7558786671 असा असून समक्ष फिर्यादि लिहुन देतो की,
मी वरीलप्रमाणे असून मागिल 25 वर्षापासून साप्ताहिक श्रमिक संदेष नावाचे वृत्तपत्र प्रकाशित करतो. त्यामुळे माझी पालघर परिसरात खुप लोकांशी ओळख आहे. त्यामुळे मी सामान्य लोकांना काही अडचणी असल्यास मदत करतो. माझ्या ओळखीचे श्री.मकबुल शहा व श्री.साफातुल्लाह चौधरी यांनी ग्रामपंचायत कार्यालय मान येथे दि. 05/12/2022 रोजी महाराष्ट्र प्रदुषण मंडळ यांचेकडून परवाना मिळविण्याकरीता ग्रामपंचायत कार्यालय मान, बोईसर, ता.जि.पालघर यांचेकडून नाहरकत दाखला (एनओसी) मिळणेकामी अर्ज केलेले आहेत. सदरबाबत कामाचा पाठपुरावा करणेकामी श्री.मकबुल शहा व श्री.साफातुल्लाह चौधरी यांनी मला अधिकारपत्र दिलेले आहे. श्री.मकबुल शहा व श्री.साफातुल्लाह चौधरी यांचे अर्जाचे अनुषंगाने ग्रामपंचायत कार्यालय मान, बोईसर ता.जि.पालघर यांनी दिनांक 14/12/2022 रोजी ठराव क्र.18(2) व 18(3) मंजूर केलेले आहेत. नाहरकत दाखला प्राप्त करण्याकरीता मी ग्रामपंचायत सदस्य श्री.अजय शिणवार यांना भेटलो असता त्यांनी माझेकडे एक एनओसी चे 25000/- हजार रूपये याप्रमाणे दोन्ही एनओसी चे 50,000/-रूपये लाचेची मागणी करून मला एनओसी देण्यासाठी टाळाटाळ केली. त्यानंतर श्री.अजय शिणवार, ग्रामपंचायत सदस्य यांनी मला दिनांक 02/02/2023 रोजी त्यांच्या बियर शॉपवर येवून एनओसी घेवून जाण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी दिनांक 02/02/2023 रोजी श्री.अजय शिणवार, ग्रामपंचायत सदस्य यांचे बियर शॉपवर जावून एनओसी घेवून आलो. तेव्हापासून श्री.अजय शिणवार, ग्रामपंचायत सदस्य हे मला नाहरकत दाखला दिल्याचा मोबदला म्हणून मला वारंवार फोन करून 50,000/-रूपये लाचेची मागणी करीत असून मला त्यांना लाचेची रक्कम देण्याची ईच्छा नसल्याने श्री.अजय सुरेश शिणवार, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत कार्यालय मान, बोईसर ता.जि.पालघर यांचेविरूध्द कायदेशिर कारवाई होणेकामी मी दिनांक 07/02/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालयात समक्ष हजर राहून लेखी तक्रार दिली.
मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालयाचे पोलीस उप अधीक्षक श्री. नवनाथ जगताप यांनी श्री.अजय षिणवार, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत कार्यालय मान, बोईसर ता.जि.पालघर हे लाचेची मागणी करतात अगर कसे याची पंच साक्षीदार यांचेसमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.नवनाथ जगताप यांनी माझे तक्रारीचे अनुषंगाने पत्र देवून दोन शासकिय पंचसाक्षीदार मागवून घेतले. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.नवनाथ जगताप यांनी नमूद पंचसाक्षीदार तसेच पडताळणी पथकाची माझी ओळख करून दिली. तसेच नमूद पंचसाक्षीदार यांना माझे तक्रारीचे अनुषंगाने थोडक्यात हकिकत समजावून सांगून त्यांना माझी तक्रार वाचण्यास दिली.
त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.नवनाथ जगताप यांनी मला तसेच दोन्ही पंचांना पडताळणीच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. तसेच ब्युरोच्या कार्यपध्दतीप्रमाणे सापळापूर्व पंचनाम्याची आवश्यक ती सर्व कार्यवाही पुर्ण करून घेतली. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.नवनाथ जगताप यांचे सुचनेप्रमाणे माझे अंगावर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच नं. 01 यांचेसह मला श्री.अजय शिणवार, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत कार्यालय मान, बोईसर ता. जि.पालघर यांचेकडे माझे कामाच्या अनुषंगाने बोलणी करण्यासाठी पाठविले. त्याप्रमाणे मी पंच नं. 01 यांचेसह श्री. अजय शिणवार, ग्रामपंचायत सदस्य यांना भेटण्यास त्यांचे अजय बियर शॉप, शॉप नं.2046, बोईसर चिल्हार रोड,

वारांगडे, ता.जि.पालघर येथे जावून श्री.अजय शिणवार, ग्रामपंचायत सदस्य यांची भेट घेतली. त्यावेळी मी त्यांना माझे कामाचे अनुषंगाने त्यांना ''एकदम जास्त झाले. दुसरे ठिकाणी पण काम करतोय ना साहेब आम्ही पण इतके नाय'' असे बोललो असता ते श्री.अजय शिणवार हे मला ''ते कोण आहेत त्यांनाच पाठवायच ना तुम्ही कश्याला मध्यस्ती करता'' असे बोलले. श्री.अजय शिणवार, ग्रामपंचायत सदस्य यांचेशी माझे कामाचे अनुशंगाने बोलणे सुरु असताना श्री.अजय शिणवार, ग्रामपंचायत सदस्य यांचे मित्र श्री.विक्रांत चुरी, रा.वारांगडे, आठलेपाडा, वारांगडे, पो. बेटेगाव, बोईसर पूर्व ता.जि.पालघर हे सदर ठिकाणी आले. त्यावेळी श्री.विक्रांत चुरी हे मला ''ते नाय बोलत होते तरी पण तुम्हाला सांगुन सांगुन देववले. मला एवढे पण बोलले काय पंचवीस पंचवीस बोललेत असं ते '' असे बोलले त्यावेळी मी त्यांना ''पंचवीस पंचवीस थोडं जास्ती होतय थोड कमी करा'' असे बोललो असता श्री.अजय शिणवार, ग्रामपंचायत सदस्य हे मला ''नाय पण बोलना झाला ता पहिले, पहिले ते क्लिअर करायचं होत ना आमच्या लोकांना हिच गोष्ट'' असे बोलले.

त्यानंतर श्री.विक्रांत चुरी हे मला ''नेक्स्ट टाईम काय होणार. कोणीच काय सांगणार नाही. आता तर स्टार्टींग आहे पुढे जाम काम पडणार आहेत. मग पाच वर्षात कमसे कम न होणा-यात जमा होणार ना होणारी काम पण नाय होणार ना. तिकडच काय असेल सरावलीच बोईसरच आपल्याला काय कुठे दहा असेल. कुठे विस असेल पन्नास पण असु शकते. समजुन चला आता तोच मार्ग आहे पुढची काम नाही होणार पुढ बरीच कामे पडणार आहेत. बरीच कामे आहेत. पुढची काम मग विसरून जा ईकडे कोण आहे त्याला तरी लावाना फोन ईकडे जो आता अवेलेबल आहे तेवढ तरी करून टाकाना'' असे बोलले त्यानंतर मी त्यांना ''दोघांच हे करून टाकतो ना कश्याला संताप पाहीजे'' असे बोललो. त्यानंतर श्री.अजय शिणवार, ग्रामपंचायत सदस्य हे देखील मला '' करून टाकाना काय दाभाडे साहेब तुम्ही हया अशा गोष्टी करतात'' असे बोलले. त्यानंतर श्री.विक्रांत चुरी हे मला ''कधीपर्यंत होईल'' असे बोलले असता मी त्यांना बँकेतून काढून आणतो. तसेच उदया आलो तर करून देतो असे बोलून मी व पंच नं.01 असे शासकिय वाहन थांबलेल्या ठिकाणी परत आलो. त्यानंतर पोहवा/चव्हाण यांनी माझेकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद केले. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.नवनाथ जगताप यांनी मला विचारणा केली असता त्यांना मी वरील प्रमाणे हकिकत सांगितली. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.नवनाथ जगताप यांनी सदरचे संभाषण ऐकले असता त्यामध्ये श्री.अजय शिणवार, ग्रामपंचायत सदस्य यांनी माझेकडील कामाचे अनुशंगाने एका एनओसीचे 25,000/-रूपये याप्रमाणे दोन एनओसीचे एकूण 50,000/-रूपये लाचेची मागणी केल्याचे तसेच सदरची लाचेची रक्कम श्री.अजय शिणवार, ग्रामपंचायत सदस्य यांना देण्याकरीता श्री.विक्रांत चुरी हे मला प्रोत्साहित करीत असल्याचे निश्पन्न झालेले असल्याचे सांगितले. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.नवनाथ जगताप यांनी मला, दोन्ही पंचसाक्षीदार तसेच पडताळणी पथकास सापळा कारवाई ही दिनांक 08/02/2023 रोजी करण्यात येणार असल्याचे सांगितले. पोलीस उप अधीक्षक श्री. नवनाथ जगताप यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी तसेच दोन्ही पंच साक्षीदार हे दिनांक 08/02/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालय येथे हजर झालो. त्यावेळी पोलीस उप अधीक्षक श्री.नवनाथ जगताप यांनी मला तसेच दोन्ही पंचांना सापळा कारवाई बाबत थोडक्यात माहीती सांगून त्यापुर्वी सापळापुर्व कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगून त्याबाबत थोडक्यात माहीती दिली. त्यानंतर मी पोलीस उप अधीक्षक श्री.नवनाथ जगताप यांना दोन्ही पंचसाक्षीदार यांचे समक्ष सापळा कारवाईकामी सध्या 25,000/-रूपये लाचेची रक्कम उपलब्ध असल्याचे सांगून माझेकडे उपलब्ध असलेली 25,000/-रूपये रोख रक्कम त्यांचेकडे हजर केली. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.नवनाथ जगताप यांनी दोन्ही पंचसाक्षीदार यांचेशी चर्चा करून मी हजर केलेल्या 25,000/-रूपये रक्कमेवर सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर मी हजर केलेल्या 25,000/-रूपये रक्कमेवर सापळा पुर्व पंचनाम्याची कारवाई पुर्ण झाल्यानंतर लाचेची रक्कम माझे नेसून पॅन्टच्या उजव्या खिशामध्ये ठेवली.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.नवनाथ जगताप यांनी सापळा पथकास योग्य त्या सुचना दिल्या व माझे अंगावर व्हॉईस रेकॉर्डर लावून लाचेच्या रक्कमेसह मला व पंच नं. 01 यांचेसह श्री.अजय शिणवार, ग्रामपंचायत सदस्य यांची भेट घेण्यासाठी त्यांचे अजय बियर शॉप, शॉप नं.2046, बोईसर चिल्हार रोड, वारांगडे, ता.जि.पालघर येथे पाठविले. त्यावेळी सर्व सापळा पथक आमचे पाठोपाठ येवून श्री.अजय शिणवार, ग्रामपंचायत सदस्य यांचे अजय बियर शॉप, शॉप नं.2046, बोईसर चिल्हार रोड, वारांगडे, ता.जि.पालघरचे परिसरात कोणास संशय येवू नये अशा रितीने थांबून राहीले.

त्यावेळी मी पंच नं.01 यांचेसह श्री.अजय शिणवार, ग्रामपंचायत सदस्य यांचे अजय बियर शॉप, शॉप नं.2046, बोईसर चिल्हार रोड, वारांगडे, ता.जि.पालघर येथे जावून श्री.अजय शिणवार यांचेशी माझे कामाचे अनुशंगाने त्यांचेशी बोलणी केलेनंतर मी माझे पॅन्टचे उजव्या खिषातून 25,000/-रूपये लाचेची रक्कम काढून ती श्री.अजय शिणवार, ग्रामपंचायत सदस्य यांचेसमोर धरली असता त्यांनी ती त्यांचे डाव्या हाताने स्विकारून त्यांचे पॅन्टचे

पाठीमागील डावे बाजूचे खिशामध्ये ठेवून दिली.
त्यानंतर मी श्री.अजय शिणवार, ग्रामपंचायत सदस्य यांनी लाचेची रक्कम स्विकारलेबाबत सापळा पथकास पूर्वनियोजित ईशारा केला असता लागलीच सापळा पथकाने श्री.अजय शिणवार, ग्रामपंचायत सदस्य यांना ताब्यात घेतले. त्यानंतर सापळा पथकाने खाजगी इसम श्री.विक्रांत राजेंद्र चुरी यांना ताब्यात घेतले. सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.
तरी माझे तक्रारीचे अनुशंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालयाकडून दिनांक 07/02/2023 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान माझे परिचयाचे दोन इसम यांना महाराष्ट्र प्रदूषण मंडळ यांच्याकडून परवाना मिळण्याकरीता ग्रामपंचायत कार्यालय मान, बोईसर, ता.जि.पालघर यांच्याकडून नाहरकत दाखला दिल्याचा मोबदला म्हणून एका नाहरकत दाखल्याचे 25,000/-(पंचवीस हजार) रूपये याप्रमाणे दोन नाहरकत दाखल्याचे एकूण 50,000/-(पन्नास हजार) रूपये लाचेच्या रक्कमेची श्री.अजय सुरेश शिनवार, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत कार्यालय मान, बोईसर ता.जि.पालघर यांनी मागणी केली. तसेच सदरची लाचेची रक्कम श्री.अजय शिणवार, ग्रामपंचायत सदस्य यांना देण्याकरीता खाजगी ईसम श्री.विक्रांत राजेंद्र चुरी यांनी मला प्रोत्साहित केले. तसेच दिनांक 08/02/2023 रोजीचे सापळा कारवाई दरम्यान 25,000/-(पंचवीस हजार) रूपये लाचेची रक्कम ही पंचसाक्षीदार यांचे समक्ष श्री.अजय सुरेश शिनवार, वय-27 वर्षे, धंदा-बियर शॉप, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत कार्यालय मान, बोईसर ता.जि.पालघर यांनी त्यांचे अजय बियर शॉप, शॉप नं.2046, बोईसर चिल्हार रोड, वारांगडे, ता.जि.पालघर येथे दि.08/02/2023 रोजी 13.14 वाजताचे सुमारास स्विकारून स्वतःचा आर्थीक फायदा करून घेतला. तसेच खाजगी ईसम श्री.विक्रांत राजेंद्र चुरी, वय 29 वर्षे, धंदा-चालक, रा.वारांगडे, आठलेपाडा, वारांगडे, पो.बेटेगाव, बोईसर पूर्व ता.जि.पालघर यांनी सदर लाचेची रक्कम देण्याकरीता मला प्रोत्साहित केले म्हणून माझी 1) श्री.अजय सुरेष शिनवार, वय-27 वर्षे, धंदा-बियर शॉप, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत कार्यालय मान, बोईसर ता.जि.पालघर, रा.वारांगडे, आठलेपाडा-वारांगडे, पो.बेटेगाव, बोईसर पूर्व ता. जि.पालघर 2)खाजगी ईसम श्री.विक्रांत राजेंद्र चुरी, वय 29 वर्षे, धंदा-चालक, रा.वारांगडे-आठलेपाडा, वारांगडे, पो.बेटेगाव, बोईसर पूर्व ता.जि.पालघर यांचेविरूध्द कायदेशिर फिर्याद आहे.
सदरची फिर्याद मी सांगितल्याप्रमाणे संगणकावर टंकलीखीत केली असून त्याची प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहीली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
~~SURESH PANDURANG SALUNKHE~~ Navnath Jagtap
**Rank** (पद): I ~~(Inspector)~~ Dysp. (ACB) **No.**(क्र.): PBMAH86589
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
बोईसर पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): PRADEEP VASANT K
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PCPN74731

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(से. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**